**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक ०२ जून २०२४**

## ठळक बातम्या

1. **लोकसभा निवडणुकांची मतमोजणी मंगळवार दिनांक ४ जून रोजी होणार, राज्यात सर्वत्र मतमोजणीसाठीची निवडणूक यंत्रणा सज्ज.**
2. **निवडणूक निकालानंतर संभाव्य हिंसाचारास प्रतिबंध करण्यासाठी सुरक्षा दलांना तैनात करण्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश.**
3. **अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत, तीन विजयी उमेदवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसला पडली एकूण १०.६ दशांश टक्के मतं.**

**आणि**

4. **पंतप्रधानांच्या नवी दिल्ली येथील निवास स्थानी "रेमाल" चक्रीवादळाच्या प्रभावाची आढावा बैठक संपन्न.**

*******

सातवा टप्पा

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात काल ६२ पूर्णांक ३६ शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली. सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ मतदारसंघामध्ये काल झालेल्या मतदानानंतर १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या जगातल्या सर्वांत मोठ्या मतदान प्रक्रियेची सांगता झाली आहे. अंतिम टप्प्यात काल सर्वाधिक मतदान, पश्चिम बंगालमध्ये ७३ पूर्णांक एकोणऐंशी शतांश, तर सर्वांत कमी मतदान बिहार मध्ये ५१ पूर्णांक ९२ शतांश टक्के इतकं झालं.

निवडणूक मतमोजणी

लोकसभा निवडणुकांचा अंतिम टप्पा काल पार पडला असून मंगळवार दिनांक ४ जून रोजी सकाळी 8 वाजेपासून मतमोजणी होणार आहे. त्यासाठी राज्यात सर्वत्र, मतमोजणीसाठीची, निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. विदर्भात वर्धा लोकसभा मतदार संघाची मतमोजणी भारतीय खाद्य निगम, गोदाम बरबडी रोड, वर्धा इथं होणार आहे. तर चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी पडोली एम.आय.डी.सी परिसरातील वखार महामंडळाच्या गोडावून इथल्या स्ट्राँग रुम मध्ये होईल.

यवतमाळच्या दारव्हा रोडवरील शासकीय धान्य गोदामाच्या ठिकाणी यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी होणार आहे. नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी कळमना मार्केट इथं ४ जून रोजी सकाळी सुरू होईल. अकोल्यातील एमआयडीसी भागात राज्य वखार महामंडळाच्या गोदामात मतमोजणीची तयारी प्रशासनाकडून  करण्यात आली आहे. तर बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ही बुलडाणा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे. तर भंडारा इथ पलाडी परिसरातील स्ट्रॉंगरूम इथ ३१ फेऱ्यामध्ये मतमोजणी होणार आहे. अमरावती मतदारसंघाची मतमोजणी लोकशाही भवन, विद्यापीठ रोड, इथं  होणार आहे. त्यानुषंगाने जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हयातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय आणि  न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतमोजणीच्या ठिकाणी फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 लागू करण्यात आलं असल्याचं आदेशात नमुद केलं आहे. मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून 200 मीटर परिसरात सर्व पक्ष कार्यालय उमेदवारांचे मंडप, मोबाईल फोन, वायरलेस सेट, ट्रांझीस्टर, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहन आणि निवडणूक कामाव्यतिरिक्त व्यक्तीस प्रवेश प्रतिबंध करण्यात आला आहे. सदरील आदेश निवडणुकीची कामे हाताळतांना कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून दि. 4 जूनच्या मध्यरात्रीपासून ते मतमोजणीची प्रक्रीया संपेपर्यंत अंमलात राहणार आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निकालांच्या ताज्या बातम्या देण्यासाठी निवडणूक विशेष बातमीपत्रं  आणि निकालांचं विश्लेषण करणारा चर्चात्मक कार्यक्रम “निवाडा जनतेचा” आकाशवाणीवर सादर होणार आहे.

निवडणूक आयोगाचे निर्देश

लोकसभेच्या सर्व जागांसाठी 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक निकालानंतर देशात कुठल्याही प्रकारचा हिंसाचार किंवा गडबड होऊ नये यासाठी निवडणूक आयोगानं ठोस व्यवस्था केली आहे. आगामी 4 जून रोजी मतमोजणीनंतरही पश्चिम बंगाल आणि ओडिशामध्ये 15 दिवस पुरेसे सुरक्षा दल तैनात करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच उत्तर प्रदेश, ओडिशा, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशमध्ये मतमोजणीनंतर सुमारे 48 तास सुरक्षा दलांना तैनात करण्याचे आदेश आहेत. यापूर्वी निवडणुकी दरम्यान हिंसाचाराची अनेक प्रकरण नोंदवली गेली होती, जिथं निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न

करण्यात आला होता. पश्चिम बंगालमध्ये अशा अनेक घटना निवडणुकीच्या सातही टप्प्यात उघडकीस आल्या, जिथे जमाव एकत्र आला आणि दंगलीसारखी परिस्थिती निर्माण झाली. जयनगरमध्ये शनिवारी जमावाने ईव्हीएम लुटले आणि व्हीव्हीपीएटी तलावात फेकल्या होत्या. या सर्व बाबी लक्षात घेऊन निवडणूक आयोगाने हा मोठा निर्णय घेतला आहे. मतमोजणीपर्यंत अडीच हजार सैनिक तैनात करण्याचे आदेशही आहेत.

एक्झिट पोल

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रीया काल संपल्यानंतर विविध वृत्तसंस्था आणि अन्य संस्थांनी एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर कल चाचणीचे आकडे प्रसिद्ध केले आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी, लोकसभा निवडणुकीत सत्ता टिकवून ठेवणार असल्याचं, बहुतांश अंदाजांमध्ये दिसून येत आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील NDA सरकार ३५० हून अधिक जागा जिंकून पुन्हा सत्तेत येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीला १५० ते १६५ मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील NDA आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडी यांच्यात थेट लढत झाली आहे. त्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळाल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन होईल.

सिक्किम आणि अरुणाचल प्रदेश निकाल

सिक्किम विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी सिक्किम क्रांतीकारी मोर्चाला पूर्ण बहुमत मिळालं आहे. सिक्किमधल्या ३२ पैकी ३१ जागांवर सिक्किम क्रांतीकारी मोर्चाने विजय मिळवला आहे.तर सिक्किम डेमोक्रॅटिक फ्रंटच्या वाट्याला एक जागा आली आहे. तसंच अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. ६० जागांपैकी ४६ जागांवर भाजपनं विजय मिळवला आहे. नॅशनल पीपल्स पार्टीने पाच जागा जिंकल्या असून राष्ट्रवादी काँग्रेसने ३, काँग्रेसने एक, पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचलनं २ जागा जिंकल्या आहेत. तर ३ अपक्ष उमेदवारांनी या निवडणुकीत विजय मिळवला आहे.अरुणाचल प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तीन आमदार निवडून आल्याचा अभिमान वाटतो, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि राष्ट्रीय सरचिटणीस आणि मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी

म्हटलं आहे. त्यांनी विजयी उमेदवारांचं अभिनंदन केलं आहे. याबद्दल श्रीवास्तव म्हणाले की, आमचे नवनिर्वाचित आमदार निकील कामीन, लेखा सोनी आणि टोकू टाटम हे राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देण्यास तयार आहेत. त्यांनी या विजयाचे श्रेय अरुणाचल प्रदेशातील कार्यकर्ते आणि नेत्यांच्या प्रयत्नांना दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला एकूण १०.०६ टक्के मते मिळाल्याचं त्यांनी सांगितलं.

रेमाल आढावा बैठक

पंतप्रधानांनी आज नवी दिल्लीतील ७, लोककल्याण मार्ग या त्यांच्या निवासस्थानी "रेमाल" चक्रीवादळाच्या प्रभावाचा आढावा घेतला. या बैठकीत चक्रीवादळाचा बाधित राज्यांवर होणाऱ्या परिणामाबाबत पंतप्रधानांना माहिती देण्यात आली. मिझोराम, आसाम, मणिपूर, मेघालय आणि त्रिपुरामध्ये भूस्खलन आणि पुरामुळे झालेल्या मानवी जीवितहानी तसच घरं आणि मालमत्तेचं नुकसान यावरही चर्चा झाली. बैठकी दरम्यान, गृह मंत्रालय, राज्य सरकारांच्या नियमित संपर्कात असल्याचं नमूद करण्यात आलं. चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या राज्यांना भारत सरकार पूर्ण मदत करत राहील, असं पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी गृह मंत्रालयाला परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे आणि आवश्यक सहाय्य देण्यासाठी नियमितपणे आढावा घेण्याचे निर्देशही दिले आहेत. यासोबतच नरेंद्र मोदी यांनी देशात सध्या सुरू असलेल्या उष्णतेच्या लाटेची परिस्थिती आणि मान्सूनच्या तयारीचा देखील आढावा घेतला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशच्या काही भागात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. या वर्षी, देशातील बहुतेक भागांमध्ये मान्सून सामान्य आणि सामान्यपेक्षा जास्त तर द्वीपकल्पीय भारताच्या काही भागांमध्ये सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

दरम्यान, उष्णतेच्या लाटेमुळे झालेल्या मृत्यूंबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुःख व्यक्त केलं आहे. अनेक ठिकाणी प्रशासनानं योग्य पाऊलं उचलून उष्णतेचा लाटेचा सामना कराव्या लागणाऱ्यांना मदत केल्याचं आणि इतरही नागरिक मदतीसाठी पुढं आल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. कामगार, शेतकरी, सरकारी कामांमध्ये व्यग्र कर्मचारी, तसंच इतर नागरिकांना उष्णतेपासून वाचण्यासाठी योग्य निवारा मिळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली आहे. तापमान विषयक समस्यां बाबतच्या कारणांचं निराकरण करणं आणि आवश्यक काळजी

घेण्याबाबत जनजागृती निर्माण करण्याची गरज असल्याचंही मत त्यांनी व्यक्त केलं आहे.

तैवान ॲथलेटिक्स

तैवानमध्ये सुरु असलेल्या तैवान ॲथलेटिक्स ओपन 2024 या स्पर्धेत महिलांच्या लांब उडीत भारताच्या नयना जेम्सन आज सुवर्णपदक जिंकल आहे. तिनं 6 पूर्णांक 43 मीटरची सर्वोत्तम उडी घेत आपलं नाव सुवर्णपदकावर कोरलं. जपानच्या सुमिरे हाताने रौप्य, तर दक्षिण कोरियाच्या यू जेओंगमीने कांस्यपदक जिंकलं. तसच काल, पुरुषांच्या भालाफेकमध्ये डी पी मनू नं  सुवर्णपदक पटकावलं, तर महिलांच्या 100 मीटर अडथळा शर्यतीत नित्या रामराजने देशासाठी रौप्यपदक मिळवलं आहे.

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली आहे. अमेरिका आणि वेस्ट इंडीज हे संयुक्तपणे या स्पर्धेचे यजमान आहेत.  या स्पर्धेत आज सहयजमान अमेरिकेनं विजयी सलामी दिली. अमेरिकेत दलास इथं अमेरिका आणि कॅनडा यांच्यात झालेला, स्पर्धेचा सलामीचा सामना अमेरिकेनं ७ गडी राखून जिंकला. स्पर्धेचा दुसरा सामना आज गयाना इथं यजमान वेस्ट इंडिज आणि पापुआ न्यू गिनी यांच्यात होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल. स्पर्धेतला भारताचा सलामीचा सामना ५ जुनला आयर्लंडसोबत होणार आहे.

हवामान

विदर्भात मागील 24 तासात सर्वाधिक तापमान वर्धा इथं  46 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. शिवाय तिथे पावसाच्या हलक्या सरी देखील काल कोसळल्या. आज विदर्भातील सर्व जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा आणि हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उद्या दिनांक 3 जून रोजी पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, नागपूर आणि वर्धा इथं हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान काल नागपूरचं  कमाल तापमान 45.4 इतकं नोंदविण्यात आलं आहे.

पीक कर्जाचे नुतनीकरण

खरीप हंगामासाठी देण्यात येणाऱ्या पिक कर्जाचे अत्यल्प वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नव्यानं कर्ज मिळविण्यासाठी पीक कर्जाचं नुतनीकरण करावं, असं आवाहन बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केलं आहे. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी पीक कर्ज वाटपाचा आढावा घेतला. यात यावर्षी पीक कर्ज वाटपाची गती नगण्य असून उद्दिष्ट दिड हजार कोटी रुपयांचं आहे. मात्र अद्याप केवळ 244 कोटी वितरीत झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी 30 जूनपूर्वी पीक कर्जाचं नूतनीकरण करून केंद्र आणि राज्य शासनाच्या व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यावा. 30 जून पूर्वी पीक कर्जाचे नूतनीकरण केल्यास तीन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाला शून्य टक्के व्याज असतं. तसंच 10 टक्के वाढीव कर्ज मिळत असल्यानं या योजनेचा लाभ घेण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

*****